REPORT OF MINOR RESERCH PROJECT

Title of Project

"CONTRIBUTION OF EMPLOYMENT GUARANTEE SCHEME IN REDUCING UNEMPLOYMENT IN GONDIA DISTRICT"

Letter No. 23-100/12(WRO)

(05th February, 2013 to 4th February 2015)

Prof Mr. Gahane R.M.

Principal Investigator

अनुक्रमणिका

प्रकरण १ ले	:	प्रस्तावना बेकारीची समस्या
प्रकरण २ रे	:	संशोधना उद्देश, गृहितके आणि तथ्य संकलन पध्दती
प्रकरण ३ रे	:	गोंदिया जिल्हाची थोडक्यात माहिती
प्रकरण ४ थे	:	रोजगार हमी योजनेवे संवैधानीक स्वरूप
प्रकरण ५ वे	:	सरकारी धोरण आणि रोजगार हमी योजना समिती
प्रकरण ६ वे	:	तथ्य विश्लेषण तालीका करण
प्रकरण ७ वे	:	सारांश, निष्कर्ष आणि सुचना

प्रकरण –१

प्रस्तावना ; (बेकारीची समस्या)

रोजगार हमी योजना ही भारतात बेरोजगारीची समस्या दूर करण्याच्या दृष्टिकोणातून राबविली जाणारी एक योजना आहे. गोंदिया जिल्हयातील रोजगार हमी योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन हे संशोधन कार्य हाती घेतले असता संशोधकाला या समस्येचे मूळ कारण असलेली बेरोजगारी या विषयासंबधी अध्ययन करणे आवश्यक वाटले. त्या दृष्टिकोणातून संशोधकाने बेरोजगारीची समस्या, स्वरुप, कारणे व प्रकार हयांचा सखोल अभ्यास करण्याचे ठरविले.

जगातील सर्वच देशात बेकारीची समस्या दिसून येते विकसित राष्ट्र असो की विकशनशील राष्ट्र असो. बेकारीचा प्रश्न दोन्ही राष्ट्रात आढळून येतो फरक एवढाच आहे की, विकसनशिल राष्ट्रातील बेकारीचे स्वरुप जास्त तिव्र व गंभीर असते तर विकसित राष्ट्रात ऐच्छिक बेकारी दिसून येते. तिची तीव्रता व गंभीरता ही कमी असते. भारतात लोकसंख्या वाढीचा दर जास्त असल्यामूळे मागेल त्याला रोजगार मिळतोच असे नाही. काम करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व क्षमता धारण केल्यावरही त्याला काम मिळत नाही. तेव्हा तो बेकार राहतो. यंत्रसामूग्रीचा वापर केल्यामुळे अनेक श्रमीक बेकार होतात. विकसनशील राष्ट्रातही सार्वजनीक कार्याकरिता व खाजगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर यंत्र सामूग्रीचा वापर होत आहे. परिणामतः भारतातील बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे असे वाटते.

याचा विपरीत परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. व पर्यायाने समाजातील कुटूंब संस्था व व्यक्ती यांच्यावर होवू शकतो.

बेकारीचा अर्थ

बेकारीचा अर्थ स्पष्ट करतांना देशातील एकूण लोकसंख्या विचारात न घेता फक्त कार्यकारी लोकसंख्या विचारात घ्यावी लागेल. सामान्यतः १५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्या ही कार्यकारी लोकसंख्या समजली जावी.

देशातील अनेक लोक कार्य करण्यास सक्षम असतात. पण ते कार्य करू शकत नाही. तेंव्हा त्यांचा समावेश कार्यकारी लोकसंख्येत करता येणार नाही. उदा. कायम स्वरूपी आजारी अवस्थेतील लोक, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुले मुली, अपंग, मतीमंद, सन्याशी व उच्चभ्रू व्यक्ती होय परंतू इच्छूक असलेल्या व्यक्तींना जेंव्हा शोधूनही काम मिळत नाही त्यावेळी अशा व्यक्तींना बेकार म्हणून संबोधले जाते व हया अवस्थेला बेकारी असे म्हणतात.

बेकारीची व्याख्या

निश्चित केलेल्या वेतन दरावर काम करण्याची इच्छा व काम करण्याची पात्रता असून देखील काम करण्याची संधी नसेल तर त्यास बेकारी असे म्हणतात.

प्रो.पिगु– "जी व्यक्ती प्रचलित मजूरीच्या दरावर काम करण्यास तयार असते ,परंतू त्या व्यक्तीला काम मिळत नाही ती व्यक्ती बेकार समजली जाते. "

प्रचलित मजूरीच्या दरावर एखादी व्यक्ती रोजगार मिळविण्यास इच्छूक असेल परंतू त्यांना रोजगार मिळत नसेल तर अशा अवस्थेला बेकारी असे म्हणतात.

भारत हा विकसनशील देश आहे. त्यामूळे रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात निर्माण करणे शक्य होत नाही. लोकसंख्या वाढल्यामूळे श्रमीकांच्या संख्येत वाढ होते. परिणामत: श्रम पूरवठयात वाढ होते. पण या प्रमाणात रोजगारात वाढ होत नाही. केन्सच्या मताप्रमाणे विकसनशील अर्थव्यवस्थेत असणारी बेरोजगारी ही प्रभावी मागणीच्या न्युनतेमुळे निर्माण होत असून ती भांडवल व इतर पूरक साधणाच्या अभावामूळे निर्माण होते म्हणून बेरोजगारीची समस्या सोडविण्याकरिता भांडवली वस्तूच्या पूरवठयात वाढ करणे आवश्यक आहे.

भारतातील बेकारीचे प्रमाण

भारतातील बेकारीचे स्वरूप हे प्रामुख्याने देशांतर्गत असलेल्या एकूण सामाजीक, आर्थिक व उद्योग आणि कृषिक्षेत्रातील असलेल्या स्थितीसी संबंधीत आहे. कृषिक्षेत्रातील बेकारी ही प्रामूख्याने ग्रामीण भागामध्ये दिसून येते तर औद्योगीक बेकारीचे स्वरूप प्रामूख्याने शहरी क्षेत्रात दिसून येते

बेकारीच्या समस्येवरील व त्यांच्या स्वरूपा संदर्भात उपरोक्त माहिती ही अत्यंत संक्षेपाने घेण्यात आलेली आहे. या माहिती संदर्भात सखोल विवेचन प्रस्तुत लघुशोध प्रकल्पात अंतर्भुत करण्यात येईल.

रोजगार हमी योजना

श्री.वि.स. पागे यांच्या शिफारशीवरून ही अभिनव योजना सुरू झाली सांगली जिल्यात तासगांव या गावात ग्रामीण बेकारीसाठी १९५६ मध्ये प्रथम एक रोजगार योजना चालू करण्यात आली त्या योजनेचा काही प्रमाणात विस्तार करून राज्यातील इतर काही तालूक्यामध्ये रोजगाराची हमी देण्यासाठी १९६९ सालापासून ही राबवण्यात आली.

१९७२-७३ या वर्षा पासून रोजगार हमी योजना या नावाने ही योजना राज्यभर लागू झाली. परंतू १९७२-७३ व ७३-७४ या वर्षी दुष्काळ पडल्याने दुष्काळी कामांमुळे ही योजना फार मूळ धरू शकली नाही. १९७४-७५ या वर्षा पासून राज्यभर या योजनेचा हिरीरीने पाठपुरावा केला गेला. १९७५-७६ या वर्षीच्या राज्याच्या अंदाजपत्रकात विशेष कर बसवून पैशाचीही तरतूद केली गेली. २६ जानेवारी १९७९ रोजी महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा लागू करण्यात आला. या अन्वये ग्रामीण महाराष्ट्रातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीस अकुशल शारिरीक काम मिळण्याची हमी देण्यात आली आहे. संपूर्ण देशात ही अभिनव योजना असून अनेक राज्य महाराष्ट्राचे अनुकरण करण्यास उत्सुक आहेत.

ही योजना केंद्र सरकारने सुध्दा संपूर्ण भारतात लागू केलेली आहे. रोजगार हमी योजनेच्या संदर्भात उपरोक्त माहिती ही अत्यंत संक्षेपाने

घेण्यात आलेली आहे या माहिती संदर्भात सखोल विवेचन प्रस्तुत लघुशोधप्रबंधात अंतर्भूत करण्यात येईल.

प्रकरण - २

संशोधनाचा उद्देश आणि गृहीतके

या प्रकरणात संशोधन पध्दतीचा विचार करण्यात आला आहे. "जिज्ञासू वृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतीम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्यनिर्णय करण्याची जी प्रक्रिया असते, तिला संशोधन म्हणता येईल." एखादया गोष्टी संबधिचे निष्कर्ष आपण आधीच स्वीकारलेले असतात परंतु नव्याने उपलब्ध झालेल्या तपशिलाच्या आधारे अथवा वस्तुस्थितीच्या आधारे पूर्वस्वीकृत निष्कर्षाची पुर्नमांडणी करण्याची, त्यांच्या पुनर्विचार करण्याची अथवा त्याचे पुर्ननिर्वचन करण्याची आवश्यकता निर्माण होते. या आवश्यकतेमुळे काही प्रयोग केले जातात. अथवा चिकित्सक आणि परिपूर्ण अन्वेषण करावे लागते त्यालाही संशोधन म्हणतात. कारण तथ्य निर्णयासाठी केलेली शास्त्रीय आणि पध्दतशीर चिकित्सा, असेच संशोधनाचे स्वरूप असते.

उद्देश

"गोंदिया जिल्हयातील बेरोजगारी कमी करण्यात रोजगार हमी योजनेचे योगदान" या विषयाचे अध्ययनासाठी खालील उद्देश निर्धारीत करण्यात आलेत.

१ रोजगार हमी योजनेमूळे गोंदिया जिल्हयातील बेरोजगारांना काम प्राप्त होऊन त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली किंवा नाही याचा अभ्यास करणे.

२ बेरोजगारीची समस्या दूर करण्या संदर्भात उपाय योजना सुचविणे.

३ रोजगार हमी योजना प्रभावी रितीने राबविण्याकरिता उपाय योजना सुचविणे.

गृहीतकृत्य

सामान्य विषय क्षेत्राचे रूपांतर ज्या संशोधन समस्येत करण्यात आलेले असते त्या संशोधन समस्येचे एक संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान म्हणजेच गृहीत कृत्य होय. गृहीतकृत्यांमूळे संशोधनाची दिशा निर्धारित होते. संशोधनकृत्याने अतिशय काळजीपूर्वक गृहीतकृत्यांची निर्मीती केली पाहीजे. गृहीत कृत्या पासून सूरू होणा-या संशोधनांना गृहीत कृत्याची चाचणी घेणारी संशोधने म्हटल्या जाते. तर दुस-या प्रकारच्या संशोधनास अन्वेषनात्मक किंवा परिचयात्मक अध्ययने म्हणतात. गृहीतकृत्ये लक्षात घेवून त्या अनुषंगाणे संशोधन कार्य केले पाहीजे. याचाच अर्थ संशोधनास दिशा देण्याचे कार्य गृहीत कृत्य करीत असते.

संशोधन विषयाच्या पूर्वज्ञान आणि माहितीच्या आधारे गृहीतकृत्यांची निर्मिती केली आहे. त्या संबधी निर्माण होणा-या समस्यांचा आराखडा तयार करण्यात येवून संशोधनासाठी कराव्या लागणा-या विविध कार्याची एक योजना तयार करून घेण्यात येईल.

संशोधनार्थ गृहितके

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील गृहीतकृत्यांचा आधार घेतला आहे.

१ रोजगार हमी योजनेमुळे गोंदिया जिल्हयातील बेरोजगारांना काम प्राप्त झाले असून त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

२ रोजगार हमी योजनेमुळे रोजगारा बरोबरच दळणवळणाची प्रगती होवून ग्रामीण रस्ते बांधणीचे कार्य ब-याच प्रमाणात झाले आहे.

तथ्य संकलन पध्दती

या संशोधनासाठी संपूर्ण गोंदिया जिल्हयाची निवड केली असून या जिल्हयातील ८ तालूक्यातील रोजगार हमी योजनेतील लाभार्थीचा समावेश करण्यात आला आहे.

या संशोधन कार्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्वरूपाचे तथ्य संकलीत करण्यात येईल.

अ <u>प्राथमीक तथ्य संकलन:-</u>

प्राथमीक तथ्य संकलनासाठी प्रश्नावलीचा उपयोग करण्यात येईल . दोन प्रकारच्या प्रश्नावली तयार करण्यात येतील.

१ लाभार्थीसाठी २ सरकारी कर्मचारी वर्गासाठी. लाभार्थीची निवड नमुना निवड पध्दतीने करण्यात येईल.

अ.क्र.	**विवरण**	**नमुना निवड**
१	लाभार्थी	२००
२	सरकारी कर्मचारी	५०

एकूण २५० व्यक्तींची नमुना म्हणून निवड करण्यात येईल.

ब <u>दुययम तथ्य संकलन</u>

दुय्यम प्रकारची माहीती राज्य शासनाचे अहवाल, अर्थ संकल्प व इतर कार्यालयीन माहितीवरून गोळा करण्यात आली.

<u>प्रकरण ३</u>

<u>गोंदिया जिल्हाची पार्श्वभुमी</u>

स्थान : गोंदिया जिल्हा महाराष्ट राज्यात पुर्व विदर्भात आहे.

सीमा : गोंदिया जिल्हाच्या पुर्वेशा छत्तीसगढ राज्यातील राजनांदगाव जिल्हा, पश्चिमेस भंडारा जिल्हा, उत्तरेस मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट जिल्हा, दक्षिणेस गडचिरोली जिल्हा आहे.

उद्योगधंदे : गोंदिया जिल्हात अनेक छोटे-मोठे उद्योग चालतात.

छोटे उद्योग : गोंदिया जिल्हामध्ये धान मील, भुसा मील, खाद्य तेल, कागद कारखान्याच्या शिवाय भारतीय खाद्यान्न निगम, लेदर कंपनी,प्लास्टीक कंपनी, बॉटल कंपनी आणि गायत्री पावर प्लॉट आहे. या प्लॉट मध्ये ३२ करोडची गुतवणुक असुन त्यात सुमारे ११० लोकांना रोजगार मिळालेला आहे. तसेच

शासकिय दुध संकलन केंद्र, राईस साल्वेंट, आरा मशिन, बाबुंची टोपली, चटई, सुपडे, विटा भटटी, कवेलु बनविण्याचालघु उद्योग सुरू आहे.

गोंदिया येथे दुरदर्शन प्रक्षेपण केंद्र आहे. गोंदिया शहर औद्योगिकरणाच्या नावानी संपुर्ण महाराष्टात प्रसिध्द आहे.

एम.आय. डी.सी. मधील मोठे उद्योग :

जिल्हातील मुंडीपार येथे महाराष्ट औद्योगिक विकास महामंडळ आहे (एम. आय.डी.सी.) या ठिकाणी खालील प्रमाणे उद्योग आहेत.

१. युनियन बोन मिल, २. सिंग कारखाना, ३. प्लास्टीक पाईप कारखाना आहे.
४. नायलान पालेथीन, ५. चिंचोली मिल पॉलिश, ६. सिंम्पलेक्स पेपर मिल
७. वायर, ८. चमडा, ९. औषधे, १०. नस, ११. गुडाखु १२. साबुन, १३. सिमेंट, १४. होजियारी, १५. इलेक्टानिक्स
१६. अदानी थर्मल पावर लिमिटेड. हा भारतातील दुस-या क्रमाकांचा सर्वात मोठा विद्युत निर्मीतीचा कारखाना आहे. अशाप्रकारे इत्यादी कारखाने आहेत. या सर्व छोटया मोठया उद्योगधंदयाचा गोंदिया जिल्हातील बेकारी थोडयाफार प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे.

गोंदिया जिल्हाची विस्तृत माहिती लघुशोध प्रबंधात खालील प्रमाणे अंतर्भुत करण्यात आलेली आहे.

गोंदिया जिल्हाची स्थापना १ मे १९९९ ला भंडारा जिल्हातुन वेगळी करून करण्यात आली. गोंदिया जिल्हामध्ये गोंदिया, तिरोडा, गोरेगांव, आमगांव सालेकसा, देवरी , स.अर्जुनी, आणि मोर. अर्जुनी अशा ८ तालुक्यांचा समावेश आहे. विदर्भातील गोंदिया जिल्हा हा उत्तर रेखावंश २०°४५¹ ते २०° ३१¹ आणि पुर्व रेखावंश ८०¹ ते ८०° वर बसलेला आहे. गोंदिया जिल्हाची एकुण लोकसंख्या १,१६,६८५ आहे. यामध्ये विविध जाती जमाती चा समावेश आहे. गोंदिया जिल्हामध्ये अनुसुचित जाती अनुसुचित जमाती यामध्ये गोंड, गोवारी, बुरड, कोळी, इत्यादीचा समावेश होतो. गोंदिया जिल्हाची समुद्र सपाटी पासुन उंची ३२७.०४ मिटर आहे. या जिल्हातील माती रेताळ व लाल असुन रेताळ

जमिनीचे प्रमाण ३४.०० टक्के तर वाळुचे प्रमाण ०.५ टक्के व इतर घटकांचे प्रमाण ५.०० टक्के आहे.

गोंदिया जिल्हातील वातावरण कोरडे व सुस्क असते. गोंदिया जिल्हामध्ये सरासरी १४० सेटीमीटर पाउस पडतो. मानसुनला जुनच्या दुस-या आठवडयात सुरूवात होउन आक्टोंबरच्या पहिल्या आठवडयात समाप्ती होते. गोंदिया जिल्हाचे तापमान मे ते जुन महिन्यात ४४° ते ४८°C ऐवढे असते. सामान्य तापमान २१° ते ३६°C असते.

गोंदिया जिल्हामध्ये भरपुर प्रमाणात जंगल पाहवयास मिळतो. यामध्ये प्रामुख्याने बांबु, येन, गराडी, पळस, मोह, सागवन, बेहळा, चिंच, आंजन इत्यादी प्रकारचे झाडे दिसुन येतात. जंगलाच्या माध्यमाने ग्रामीण भागातील अनेक लोक आपल्या उपजिवीका करतात. यामध्ये डिंक, लाख, मोह फुले, जलावु लाकुड, इत्यादी प्रकारची जवळच्या गावामध्ये विक्री करतात.

गोंदिया जिल्हामध्ये प्रमुख पिक भात हे आहे. धान्याचे पिक आल्यानंतर त्याची भरडाई करण्याकरिता राईस मिल मध्ये नेण्यात येते. गोंदिया जिल्हात बरेचसे राईस मिल दिसुन येतात. यामध्ये अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होताना दिसुन येते.

प्रकरण –४

रोजगार हमी योजनेचे संवैधानीक स्वरूप

१ पार्श्वभूमी:

भारतीय संविधानाच्या भाग ४ मध्ये राज्य संस्थेने राज्यकारभार करतांना अंगिकारावयाची मार्गदर्शक तत्वे नमुद केली आहेत. त्यातील अनुच्छेद ४१ अन्वये राज्य संस्थेने प्रत्येक नागरिकाला निर्वाहाचे साधन अथवा रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त करून देण्याबाबत प्रयत्नशील रहावे असे सांगण्यात आले आहे. संविधानात नमूद केलेल्या या तत्वानुसार महाराष्ट्र शासनाने १९७२ साली १५ कलमी कार्यक्रम तयार केला होता. त्यामध्ये रोजगार हमी योजनेचाही समावेश होता.

अंगमेहनतीची कामे करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काम मिळवून देऊन स्वाभीमानाने जीवन जगण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहीजे. ही राज्य शासनाची रोजगार हमी योजना सुरू करण्यामागील भूमीका आहे. महाराष्ट्रातील शेतमजूरांना शेतीच्या हंगामात वर्षभरात सरासरीने चार ते साडेचार महिने काम मिळते. शेतीचा हंगाम नसतो तेंव्हा कामा अभावी त्यांची श्रमशक्ती वाया जात असते. आणि काम नसते म्हणून त्यांना उपाशी पोटी रहावे लागते. वाया जाणा-या श्रमशक्तीचा उपयोग करून उत्पादन स्वरूपाच्या विकासाच्या अनेक योजना पूर्ण करणे व त्या बरोबर शेतमजूरांना काम देऊन त्यांची उपासमार रोखणे अशा दुहेरी हेतुने राज्य शासनाने रोजगार हमी या योजनेचा अंगीकार केला.

या योजनेची कार्यवाही काटेकारेपणे होणे गरजेचे आहे ज्यामूळे योजनेची उद्दिष्टे सफल होतील. तसेच श्रमिकांना शासनाने उपलब्ध केलेल्या सोयी सवलतीच्या लाभ होईल.

प्रकरण – ५

सरकारी धोरण आणि रोजगार हमी योजना समिती

समितीची रचना:

रोजगार हमी योजनेखालील श्रमीकांना शासनाने केलेल्या सोयी सवलतीच्या कितपत लाभ होतो, योजनेचा श्रमिकांवर काय परिणाम होतो व योजनेचे उद्दिष्टे साधण्याच्या दृष्टीने काय करणे आवश्यक आहे. या संबधी शासनाला सुचना करण्याच्या हेतुने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची रोजगार हमी योजना समिती दि.१३ ऑगष्ट १९७५ रोजी गठीत करण्यात आली. मा. अध्यक्ष आणि मा. सभापती हे या समितीवरील सदस्यांना नामनियुक्त करतात. व त्यानुसार या समितीवरील विधानसभेचे २० व विधानपरिषदेचे ५ सदस्य असतात. (म.वि.स.२४१)

समितीची कामे:

रोजगार हमी योजने अंतर्गत कामावर असलेल्या मजुरांना मिळालेले फायदे व त्यांच्यावर या योजनेचा झालेला परिणाम याच्या विशेष संदर्भात या योजनेबाबत परीक्षणे करणे , तत्संबंधात अंदाज घेणे आणि मूल्यमापण करणे, तसेच त्या बाबतीत कोणत्याही त्रुटी व उणिवा असल्यास त्या शोधून काढणे व त्या दूर करण्यासाठी आणि सुधारणा करण्यासाठी उपाय योजना सुचविणे तसेच योजनेचे काम अधिक चांगल्या प्रकारे चालविण्यास हितावह ठरतील अशा शिफारशी करणे व त्या शिफारशीनुसार सुचविलेल्या योजनेच्या उद्दिष्टांची चांगल्या निष्कर्षामध्ये परिणिती ही या समितीची कामे असेल.

प्रकरण – ६

तथ्य विश्लेषण

या प्रकरणात दुय्यम व प्राथमिक तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले. संशोधन कालावधी सन २००६–२००७ ते २०१०–२०११ हा आहे. उर्वरीत माहितीच्या तालीकांवरून संपूर्ण तथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. दुय्यम तथ्यांच्या विश्लेषणा नंतर प्राथमिक तथ्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. प्राथमिक माहिती प्रश्नावलीद्वारे लाभार्थीकडून गोळा करण्यात आली. तसेच शासकीय कर्मचा–याकडून माहिती गोळा करण्यात आली. या माहितीचे सविस्तर विवचेन पुढील प्रमाणे दिलेले आहे.

संकलीत माहितीचा आधारावर निष्कर्ष व सुचना

गोंदिया जिल्हा प्रामुख्याने तांदुळ पिकविणारा जिल्हा आहे. मुख्य पिक भाताचे असल्यामुळे, हे पिक निघालानंतर शेतमजुरांना काम नसते. रोजगार हमी योजनेमूळे त्यांना काम मिळण्याची हमी मिळाली असे दिसुसन आले. थोडक्यात याचा अर्थ असा होतो की, या योजनेमुळे लोकांना काम नक्की मिळेल हे समजले आहे.

गोंदिया जिल्हातील बेरोजगारी कमी करण्यात रोजगार हमी योजनेचे योगदान :– सर्वेक्षण करीत असतांना गोंदिया जिल्हातील आणि तालुक्यातील निवडक २००

लाभार्थ्यांची निवड करण्यात आली त्याकरिता त्यांच्याकडुन प्रश्नावलीद्वारे माहिती घेतली व त्यानुसार स्पष्टीकरण करण्यात आले.

तालिका क्रमांक १

लाभार्थ्यांची शिक्षणानुसार वर्गवारी

अ.क्र.	शैक्षणिक पात्रता	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	अशिक्षित	८५	४२.५०%
२	इयता चौथी पास	५५	२७.५०%
३	एस.एस.सी. पास	६०	३०.००%
	एकुण	२००	१००%

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, प्रश्नावलीद्वारे जी माहिती प्राप्त झाली त्यानुसार एस.एस. सी. पास करून रो.ह.यो. च्या कामावर येणारे ६० लाभार्थी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३०% इतके आहे. इयता चौथी पास झालेले लाभार्थी ५५ असुन त्यांचे शेकडा प्रमाण २७.५०% इतके आहे. अशिक्षित लाभार्थी ८५ इतके असुन त्यांचे शेकडा प्रमाणे ४२.५०% इतके आहे

तालीका क्रमांक २

लाभार्थ्यांची शेतीनुसार वर्गवारी

अ.क्र.	शेती असलेले	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	भुमीहीन	९८	४९.००%
२	एक ते दोन एकर	६०	३०.००%
३	दोन ते तीन एकर	३०	१५.००%
४	तीन ते पाच एकर	१२	०६.००%
५	पाच ते जास्त	निरंक	निरंक
	एकुण	२००	१००%

वरील सारणीवरून असे निदर्शनास आले की, पाच एकर पेक्षा जास्त शेती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या शुन्य आहे. तीन ते पाच एकर पर्यंत शेती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या १२ इतकी असुन शेकडा प्रमाण ०६.००% इतके आहे. दोन ते तीन

एकर शेती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ३० इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण १५.००% इतके आहे, तर एक ते दोन एकर शेती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ६० असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३०.००% इतके आहे, तर भुमिहीन असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ९८ त्यांचे शेकडा प्रमाण ४९.००% इतके आहे.

तालीका क्रमांक ३

उत्पन्नानुसार लाभार्थ्यांची वर्गवारी

अ.क्र.	उत्पन्न गट	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	६०००–९०००	१०३	५१.५०%
२	९०००–१२०००	४८	२४.००%
३	१२०००–१५०००	२८	१४.००%
४	१५०००– २००००	२१	१०.५०%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, वार्षिक ६००० ते ९००० उत्पन्न मिळविणारे लाभार्थी संख्या १०३ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ५१.५०% इतके आहे. ९००० ते १२००० उत्पन्न मिळणारे लाभार्थी संख्या ४८ असुन त्यांचे शेकडा प्रमाणे २४.००% इतके आहे. १२००० ते १५००० उत्पन्न मिळणारे लाभार्थी २८ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १४.००% इतके आहे. १५००० ते २०००० रू उत्पन्न मिळणारे लाभार्थी २१ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १०.५०% इतके आहे.

तालीका क्रमांक ४

कुटुंबातील व्यक्तिनुसार विभागणी

अ.क्र.	व्यक्तिंचा गट	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	० ते २	४८	२४.००%
२	२ ते ४	८७	४३.५०%
३	४ ते ६	३९	१९.५०%
४	६ ते ८	२६	१३.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, कुटुंबातील ० ते २ व्यक्तिं गट असणारे लाभार्थी संख्या ४८ असुन त्यांचे शेकडा प्रमाण २४.००% इतके आहे. २ ते ४ व्यक्ती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ८७ इतकी आहे त्यांचे शेकडा प्रमाण ४३.५० इतके आहे. ४ ते ६ व्यक्ती असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ३९ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १९.५० इतके आहे. ६ ते ८ व्यक्तींचा गट असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २६ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १३.०० इतके आहे.

तालीका क्रमांक ५

लाभार्थ्यांची वयानुसार विभागणी

अ.क्र.	व्योगट	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	१८ ते २५	२२	११.००%
२	२६ ते ३५	३९	१९.५०%
३	३६ ते ४५	७३	३६.५०%
४	४६ ते ५५	४७	२३.५०%
५	५६ ते ६५	१९	०९.५०%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, १८ ते २५ वयोगट असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २२ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ११.००% इतके आहे. २६ ते ३५ वयोगट असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ३९ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण १९. ५०% इतके आहे. ३६ ते ४५ वयोगट असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ७३ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३६.५०% इतके आहे. ४६ ते ५५ वयोगट असलेल्या लाभार्थ्यांची संख्या ४७ असुन त्याचे शेकडा प्रमाण २३.५०% इतके आहे. ५६ ते ६५ वयोगट असलेल्या लाभार्थ्यांची संख्या १९ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ९.५०% इतके आहे.

तालीका क्रमांक ६

लाभार्थ्यांना मजुरी वाटप करण्यात आलेल दिवसानुसार विभागणी

अ.क्र.	वाटपाचे दिवस	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	सात दिवसांच्या आत	११५	५७.५०%
२	पंधरा दिवसाच्या आत	८५	४२.५०%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, सात दिवसाच्या आत मजुरी मिळेल असे म्हणण–या लाभार्थ्यांची संख्या ११५ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ५७.५०% इतके आहे. पंधरा दिवसाच्या आत मजुरी मिळेल असे म्हणणा–या लाभार्थ्यांची संचया ८५ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ४२.५० इतके आहे.

तालीका क्रमाक ७

मजुरीतील रक्कम सुरक्षिततेच्या योजनामध्ये गुतवणुकीनुसार वर्गवारी

अ.क्र.	योजनेतील गुतवणुक	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	आरोग्य विमा	६८	३४.००%
२	अपघात विमा	९४	४७.००%
३	बाळंतपणाची तरतुद	३८	१९.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, मजुरीतील रक्कम सुरक्षिततेच्या दृष्टीने आरोग्य विमा योजनेत गुतवणुक करणा–या लाभार्थ्यांची संख्या ६८ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३४.००% इतके आहे. अपघात विमा योजनेमध्ये गुतवणुक करणा–या लाभार्थ्यांची संख्या ९४ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ४७.००% इतके आहे. बाळतपणाची तरतुद म्हणुन गुंतवणुक करणा–या लाभार्थ्यांची संख्या ३८ असुन त्याचे शेकडा प्रमाण १९.००% इतके आहे.

तालीका क्रमाक ८

मजुरी निश्चिती पध्दती नुसार वर्गवारी

अ.क्र.	मजुरी निश्चिती	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	रोजदांरी पध्दती	१२२	६१.००%
२	कामाप्रमाणे मजुरी	८८	३९.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, मजुरी रोजंदारी पध्दतीने निश्चित करण्यात यावे असे दर्शविणा–या लाभार्थ्यांची संख्या १२२ असुन त्याचे शेकडा गप्रमाण

६१.००% इतके आहे. कामाप्रमाणे मजुरी असावी असे सांगणा-या लाभार्थ्यांची संख्या ८८ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३९.००% इतके आहे.

तालीका क्र. ९

कामाचे दरपत्रक दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	कामाचा दरपत्रक	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	दरपत्रक जाहीर होतात	१०९	५४.५०%
२	दरपत्रक जाहीर होत नाही	९१	४५.५०%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, कामाचे दरपत्रक वेळोवळी जाहीर होतात असे सांगणारे लाभार्थ्यांची संख्या १०९ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ५४. ५०% इतके आहे. दरपत्रक वेळोवेळी जाहीर होत नाही असे सांगणारे लाभार्थी संख्या ९१ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ४५.५०% इतके आहे

तालीका क्र. १०

वर्षातील काम मिळणारे दिवस दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	काम मिळणारे दिवस	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	३० दिवस	३५	१७.५०%
२	५० दिवस	९७	४८.००%
३	७० दिवस	३८	१९.००%
४	१०० दिवस	३०	१५.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, ३० दिवस काम मिळणारे लाभार्थी ३५ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १७.५०% इतके आहे. ५० दिवस काम मिळणारे लाभार्थी ९७ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ४८५०% इतके आहे. ७० दिवस काम मिळणारे लाभार्थी ३८ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १९.००% इतके आहे. १०० दिवस काम मिळणारे लाभार्थी ३० असुन त्यांचे शेकडा प्रमाण १५.००% इतके आहे.

तालीका क्र. ११

मजुर नोंदणी दर्शक तक्ता

अ.क्र.	नोदणी होय/नाही	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	नोंदणी करता काय ? होय/नाही	१६७	८३.५०%
२	नोंदणी करता काय ? नाही/होय	३३	१६.५०%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की,कामाकरिता नोंदणी करणा-या लाभार्थ्यांची संख्या १६७ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ८३.५०% इतके आहे. तर नोंदणी करणा-या लाभार्थ्यांध्वी संख्या ३३ असुन त्यांचे शेकडा प्रमाण १६.५०% इतके आहे.

तालीका क्र. १२

मजुर म्हणुन जॉब कार्ड दर्शक तक्ता

अ.क्र.	कार्ड मिळतो काय ?	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	कार्ड मिळतो काय ? होय	१३९	६९.५०%
२	कार्ड मिळत नाही काय ?	६१	३०.५०%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, मजुर म्हणुन कार्ड मिळणा-या लाभार्थ्यांवी संख्या १३९ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ६९.५०% इतके आहे. कार्ड मिळत नाही अशा लाभार्थ्यांची संख्या ६१ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३०.५०% इतके आहे.

तालीका क्र. १३

दिलेल्या कामानुसार कामे कराण्याची तयारी दर्शक तक्ता

अ.क्र.	दिलेले कामे	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	काम करण्याची तयारी असलेले	२००	१००%
२	काम करण्याची तयारी नसलेले	००	००.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, शासनाने दिलेली कामेकरण्याची तयारी असलेले लाभार्थी संख्या २०० इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण १०० इतके आहे. सांगितलेले काम न करण्याची तयारी असलेले लाभार्थी संख्या शुन्य इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण शुन्य आहे

तालीका क्र. १४

कामाच्या ठिकाणी उपलब्ध सोयीनुसार विभागणी दर्शक तक्ता

अ.क्र.	उपलब्ध सोयी	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	पिण्याच्या पाण्याची सोय	९७	४८.५०%
२	सावलीचा निवास	६६	३३.००%
३	औषोधोपचार सोय	२८	१४.००%
४	पाळणाघर	०९	४.५%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय आहे असे म्हणणा-या लाभार्थ्याची संख्या ९७ इतकी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ४८.५०% इतकी आहे सावलीचा निवारा असलेला ठिकाण सांगणारे लाभार्थी ६६ असुन त्याचे शेकडा प्रमाण ३३.००% इतके आहे. तर कामाच्या ठिकाणी औषोधोपचाराची सोय आहे असे सांगणारे २८ लाभार्थी असुन त्यांचे शेकडा प्रमाण १४. ००% इतके आहे. तर कामाच्या ठिकाणी पाळणाघराची सोय आहे असे सांगणारे लाभार्थी ०९ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ४.५% इतके आहे.

तालीका क्र. १५

मजुरीचे वाटपाची पध्दती दर्शक तक्ता

अ.क्र.	वाटपाची पध्दत	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	बॅकेद्वारे	१४०	७०.००%
२	पौष्टद्वारे	६०	३०.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, मजुरीचे वाटप बॅकेद्वारे होते असे सोंगणारे लाभार्थी १४० असुन त्यांचे शेकडा प्रमाण ७०.००% इतके आहे. तर पोष्टद्वारे होते असे सांगणारे ६० लाभार्थी असुन त्यांचे शेकडा प्रमाण ३०.०० % इतके आहे

तालीका क्र. १६

रोजगार हमी योजने मुळे उत्पन्नातील वाढ दर्शक तक्ता

अ.क्र.	उत्पन्नात वाढ	लाभार्थी संख्या	% प्रमाण
१	होय	१९०	९५.००%
२	नाही	१०	५.००%
	एकुण	२००	१००%

वरील तालीकेवरून असे निदर्शनास येते की, उत्पन्नात वाढ झालेल्या लाभार्थ्यांची संख्या १९० असुन त्यांचे शेकडा प्रमाण ९५.००% इतके आहे. तर उत्पन्नात वाढ झालेली नाही असे म्हणणारे लाभार्थी १० असुन त्यांचे शेकडा प्रमाण ५. ००% इतके आहे.

प्रकरण – ७

सारांश, निष्कर्ष आणि सुचना

या प्रकरणात सारांश, निष्कर्ष व उपाययोजना प्रस्तूत करण्यात आली.

निष्कर्ष व सुचना

तालीका क्र. १

अभ्यासलेल्या लाभार्थ्यांपैकी अशिक्षित असलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण ४२.५०% असल्यामुळे ते या योजनेत काम करण्यास पुढाकार घेतात. परंतु २७.५०% लाभार्थी इयता चौथी व ३०.००% लाभार्थी एस.एस.सी. पास करणारे लाभार्थ्यांचा सहभाग कमी दिसुन आला. रोजगार हमी योजने अंतर्गत कामे अकुशल मजुरांकडुन करावयाचे असल्याने शिक्षण जरी कितीही असले तरी कामाची तयारी असलेल्या व्यवितला ला कामे करायला पाहीजे.

तालीका क्र. २

अभ्यासलेल्या लाभार्थ्यापैकी ७९.००% भुमिहीन असल्यामुळे ते या योजनेच्या फायदा घेतात. तर ३०.००% लाभार्थी एके ते दोन एकर शेती असलेले, १५.००% लाभार्थी दोन ते तीन एकर शेती असलेले, ६.००% लाभार्थी तीन ते पाच एकर शेती असलेले, ते या योजनेचा कमी फायदा घेताना दिसतात. शेतीच्या हंगामानंतर त्यांना कामे नसतात. त्यामुळे त्यांनी या योजनेत सहभागी व्हायला पाहिजे.

तालीका क्र. ३

अभ्यासलेल्या लाभार्थ्यांचे रू. ६००० ते ९००० वार्षीक उत्पन्न असलेल्यांना उत्पन्न वाढविण्याची गरज असते. म्हणुन त्यांचा मजुर म्हणुन नाव नोदंण्याकडे कल जास्त असतो. त्यांचे प्रमाण ५१.५०% आहे. रू. ९००० ते १२००० उत्पन्न असेलेल लाभार्थी २४.००% तर १२००० ते १५००० उत्पन्न असलेले लाभार्थी १४.००% तर १५००० ते २०००० उत्पन्न अस लेले लाभार्थी १०.५०% असल्यामुळे यांचा सहभाग कमी असतो. परंतु उत्पन्नाला जोड म्हणुन लाभार्थ्यांनी या योजनेत सहभागी व्हायला पाहिजे.

तालीका क्र. ४

अभ्यासलेल्या लाभार्थ्यांच्या कुटुबांतील सदस्य संख्या २ ते ४ व्यक्तिंच्या असलेल्या लाभार्थी प्रमाण ४३.५०% आहे. ०. ते २ सदस्य संख्या आलेले लाभार्थी २४. ०० % ४ ते ६ सदस्य संख्या असलेले १९.५०% तर ६ ते ८ सदस्य संख्या असलेले १३.०० % जास्त सदस्य असल्याने ते इतर काम करतात. त्यामुळे त्यांचा सहभाग कमी आहे. कुटुबांतील सर्वांनी या योजनेचा लाभ घेतल्याने रोजगात वाढ होईल.

तालीका क्र. ५

अभ्यासलेल्या लाभार्थ्यांची वय ३६ ते ४५ वर्षे असलेले लाभार्थी ३६.५०% आहेत. यांच्याध्ये रोजगार हमी योजनेचा लाभ मिळण्याचे प्रमाण जास्त आहे. तर ११. ००% १८ ते २५ वर्षे वय असलेली लाभार्थी . १९.५०% २६ ते ३५ वर्षे वय लाभार्थी २३.५०% ४६ ते ५५ वयाचे लाभार्थी आहेत तर ९.५०% ५६ ते ६५ वयाचे आहेत. तरूण मजुरांनी या योजनेत सहभागी झाल्यास योजनेची उद्देश्य पुर्ण होतील.

तालीका क्र. ६

अभ्यासलेल्या लाभाथ्र्यापैकी सात दिवसाचे आत मजुरी मिळते असे म्हणणारे ५७.५०% आहेत तर ४२.५०% पंधरा दिवसाच्या आत मजुरी मिळते म्हणणारे आहेत. मजुरी सात दिवसानंतरच देण्याच यावी.

तालीका क्र. ७

आरोग्य विमा योजनेत मजुरीतील रक्कम गुतविणारे लाभार्थी ३४.२० % आहेत तर ४७.००% अपघात विमा योजनेत रक्कम गुतविणारे लाभार्थी आहेत तर १९.००% लाभार्थी बाळतपणाची तरतुद करणारे आहेत. अपघात विमा योजनेतील लाभार्थी जास्त आहेत. परंतु जीवन विमा योजनेत रक्कम गुतविण्याकरिता प्रवृत्त करावे.

तालीका क्र. ८

६१.००% लाभार्थी रोजदार मजुरी पध्दतीला प्राधान्य देणारे आहेत तर ३९.००% लाभार्थी कामाप्रमाणे मजुरी पध्दतीला प्राधान्य देणारे आहेत. कामाप्रमाणे मजुरी पध्दतीचा जास्त प्रमाणात अवलंब केला जावा. रोजदार पध्दतीमध्ये काम करण्याचे प्रमाण कमी असते.

तालीका क्र. ९

५४.५० लाभार्थी दरपत्रक जाहीर होतात असे म्हणणारे लाभार्थी आहेत. तर ४५.५० लाभार्थी दरपत्रक जाहीर होत नाही म्णणारे आहेत. दरपत्रक वेळोवेळी जाहीर करण्या यावे.

तालीका क्र. १०

अभ्यासलेल्या लाभाथ्र्यांपैकी ४८.००% लाभार्थी ५० दिवस व त्यापैकी जास्त काम मिळणारे आहेत. तर १९.००% लाभार्थी ७० दिवस काम मिळणारे आहत. तर १७.५० लाभार्थी ३० दिवस काम मिळणारे आहेत. तर १५.०० % लाभार्थी १०० दिवस काम मिळणारे आहेत. ५० ते त्यापेक्षा जास्त दिवस काम म्हणजेच जवळपास १०० दिवस काम मिळायलाच हवे.

तालीका क्र. ११

रोजगार हमी योजनेत आपले नांव नोंदविणारे ८३.५० % लाभार्थी आहेत. १६.५० % लाभार्थी नोदंणी न करणारे आहेत. नोंदणी करणे आवश्यक आहे हे त्यांना

कळुन चुकले आहे. रो.ह.यो. ची नोंदणी करण्याचा कालावधी संबंधीतांनी दवंडी देवुन अथवा सार्वजनिक ठिकाणावरून प्रसारीत करावा.

तालीका क्र. १२

अभ्यासेलेल्या लाभाथ्यांपैकी ६९.५०% लाभार्थी जॉबकार्ड मिळवुन घेतात. ३०.५० %लाभार्थ्यांचा विषयी आस्था दिसुन आली नाही. जॉब कार्ड मिळवुन घेणे गरजेचे आहे.

तालीका क्र १३

अकुशल कामगारांना काम देवुन रोजगारात वाढ करणे या उद्देशाने मजुरांना दिलेल्या कामानुसार काम करावे लागते. जे काम दिलेली आहेत ते काम करणारे १०० मजुर दिसले. काम सुरू करून ठरलेलीच कामे करवुन घ्यावेत.

तालीका क्र. १४

कार्यस्थळी मजुरांना विविध सोयी पुरविण्यात येतात. ४८.५० % लाभार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय दिसली तर ३३.००% लाभार्थ्यांना सावलीचा निवास आहे असे सांगितले १४.००% लाभार्थ्यांनी औषोधोपचार सोय राहते असे म्ळअले तर ४.५ % लाभार्थ्यांना पाळणाघराची सोय असल्याचे सांगितले निदान स्वच्छ पिण्याचा पाण्याची आणि सावलीचा निवास या सोयी १००% पुर्ण असायला पाहिजेत.

तालीका क्र १५

रो.ह.यो. ची मजुरी ७०.००% लाभार्थ्यांना बॅकद्वारे प्राप्त झाल्याची दिसुन आले. तर ३०.००% लाभाथ्र्यांना पोष्टद्वारे झाल्याचे दिसुन आले. मजुरी बॅकद्वारे देण्यात यावे.

तालीका क्र. १६

रोजगार हमी योजनेमुळे मजुरांना रोजगार प्राप्त झाला त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली याचे प्रमाण ९५.००% इतकी आहे. उत्पन्नात वाढ न झालेले फक्त ५.०० % लाभार्थी दिसले निश्चितच उत्पन्न वाढ होते असे म्हणता येईल.

जिल्हातील रो.ह..यो. मधील शासकिय अधिकारी संस्थाकडुन माहितीचे संकलन करण्याकरिता ५० अधिका-यांची निवड करण्यात आली. त्यासाठी त्यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे माहिती घेतली व त्यानुसार स्पष्टीकरण करण्यात आले.

शासकिय अधिका-यांना दिलेल्या प्रश्नावली द्वारे संकलीत करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे असा निष्कर्ष मिळतो की, रोजगार हमी योजनेची अमलंबजावणी प्रभावी पणे करण्यात आली. जिल्हात मजुरांची बेराजगारीची समस्या दुर करण्यासाठी

शासकिय निधी उत्पादन स्वरूपाच्या विकासाच्या विविध योजना पुर्ण करण्यात योग्य रितीने खर्च करण्यात आला. त्यामधुन शेतमजुरांना काम देणे हे प्रमुख उदिष्ट पुर्ण झाले.

1. कुटुबं प्रमुखाची मजुर म्हणून नोंद करण्यात येते किंवा नोंद करण्यात येत नाही. असा प्रश्न अधिका-यांना देण्यात आला त्यापैकी ८०.००% अधिका-यांनी नोंद करण्यात येते असे उत्तर दिले तर २०.००% अधिका-यांनी नोंद करण्यात येत नाही असे सांगितलेले आहे.
2. जॉब कार्डाचे वाटप याबाबत प्रश्न दिला असता वेळेवर जॉब कार्डचे वाटप करण्यात येते असे सांगणारे ९०.००% अधिकारी मिळाले तर जॉब कार्डचे वेळेवर वाटप करण्यात येत नाही असे सांगणारे १०.००% अधिकारी मिळाले.
3. कामाच्या मागणी अर्जाची स्विकृती सहज स्विाकाले जातात आणि अपुर्ण अर्ज रद्द केले जातात याबाबतीत सर्व अधिका-यांनी सांगितले.
4. कामाची निवड वार्ड सभेद्वारे किंवा ग्राम सभेद्वारे करण्यात येते काय ? होय म्हणणारे फक्त २०.००% अधिकारी मिळाले तर ८०.०० अधिका-यांनी शासनाद्वारे कामाची माहिती प्रात होते असे सांगितले.
5. कामाचे अंदाजपत्रक व कामाच्या सुरूवाती संबंधीची काम प्रक्रिया आहे? खर्चाची योग्य तरतुद करण्यात येते असे सांगणारे ७५.००% अधिकारी आहेत तर २५. ००% खर्चाची तरतुद करण्यात येत नाही ती शासकिय बाब आहे असे सांगणारे मिळाले
6. १५ दिवसाच्या आत मजुरी देण्यात येते काय ? असा प्रश्न विचारला वेळेवर मजुरी १५ दिवसाचे आत देण्यात येते असे म्हणणारे ८०.००% अधिण्कारी आहेत तर २०.००% अधिका-यांनी १५ दिवसाच्या आत मजुरी देण्यात विलंब होत असे सांगितले
7. कामाचा मोबदला निर्दिष्ट दराप्रमाणे देण्यात येते काय ? असा प्रश्न विचारला असता १००% अधिका-यांनी निर्दिष्ट दराप्रमाणेच देण्यात येते असे सांगितले.

8. बेरोजगारी भत्ता देण्यास पात्र लाभार्थी असतात काय ? असा प्रश्न विचारला असता १०.००% अधिका-यांनी असतात असे सांगितले तर ९०.००% अधिका-यांनी पात्र नसतात असे सांगितले.
9. मुल्याकंन प्रक्रियेमध्ये सहभागी होता काय ? असे विचारले असता होय म्हणणारे ७०.०० अधिकारी मिळाले तर नाही म्हणणारे ३०.०० नाही म्हणणारे मळाले.
10. सामाजिक अंकेक्षण प्रक्रियसेमध्ये सहभागी होण्याबाबत प्रश्न विचारले असता ९०.००% अधिकारी सहभाग होणारे मिळाले तर १०.००% सहभागी न होणारे मिळाले

सुचना (शिफारसी)

1. रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणारे कामे अकुशल मजुरांडून करावयाचे असल्यामुळे प्रौढ व्यक्तिंनी जरी शिक्षण कितीही असले तरी इच्छा असेल त्यांनी कामे करायला पाहिजे.
2. मजुरांनी इतरत्र स्थलांतरीत न होता शेतींचा हंगाम संपल्यानंतर रो.ह.यो. च्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे.
3. कामाची निवड वार्ड सभेद्वारे किंवा ग्रामसभेद्वारे करण्यात येत असल्यामुळे संपुर्ण गावक-यांना दवंडी देवुन सभेची सुचना देण्यात यावी.
4. मजुरीचे वाटप आठवडयातुन एक दिवस, जो दिवस बाजार दिवस असतो त्या दिवशी करायला पाहिजे
5. कामाचा मोबदला शासनाने ठरवुन दिलेल्या दराप्रमाणेच देण्यात आला पाहिजे.
6. एखाद्या मजुराला त्याने काम मागितल्या दिवसापासुन पंधरा दिवसात त्याला काम देता आले नाही तर कायदयाच्या तरतुदीनुसार त्याला बेरोजगारी भत्ता देण्यात यावा.
7. कुटुबांतील सर्व प्रौढ व्यक्तिंनी रोजगार हमी योजनेचा पुर्ण फायदा घेण्याकरिता या योजनेत सहभागी व्हावे.
8. बेरोजगार तरूणांनी या योजनेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे त्यामुळे योजनेचे उदिष्टये पुर्ण होतील.

9. भविष्याची तरतुद म्हणुन आरोग्य, अपघात, बाळपणाची तरतुद अशा विविध योजनामध्ये रक्कम गुतवावी.

10. अधिका–यांनी शासनाने निर्दिष्ट दर वेळोवेळी जाहीर करावे.

11. कामाप्रमाणे मजुरी देण्याला जास्त प्राधान्य देण्यात यावे, रोजदांरी पध्दती मध्ये कामाचे उद्दिष्टये पुर्ण करण्यात अडचणी निर्माण होतात.

12. कामाच्या ठिकाणी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय सावलीचा निवास, औषोधोपचार सोय असायलाच पाहिजे.

Principal Investgator Principal